## विषेश दिवाणी मुकदमा क्र. १०७/२०२२ मधील नि.५२ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.७ व १५ यांचे मार्फत लेखी कैफियत सादर करण्यास त्यांना झालेला विलंब माफ होवून लेखी कैफियत सादर करणेस परवानगी मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

०२. प्रतिवादी क्र.७ व १५ यांनी दाखल केलेला अर्ज व त्यावर वादी तर्फे सादर करण्यात आलेले लेखी म्हणणे याचे अवलोकन केले.

०३. प्रतिवादी व वादी तर्फे विधिज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला.

०४. प्रतिवादी ७ व १५ यांचे थोडक्यात असे कथ्न आहे की , ते मच्छीव्यवसाय करणारे सर्वसामान्य व्यक्ती असल्याने दाव्याचे समन्स प्राप्त झाल्यानंतर मुदतीत कोर्टात् हजर राहून वकीलांचा सल्ला घेवून लेखी म्हणणे मांडावयाचे असते या तांत्रीक बाबीचे ज्ञान प्रतिवादी यांना नसल्याने त्यांना लेखी कैफियत सादर करण्यास विलंब झालेला आहे. अशाप्रकारे प्रतिवादी क्र.७ व १५ यांनी लेखी कैफियत सादर करण्यास झालेला विलंब माफ होण्याची विनंती केली व लेखी कैफियत सादर करण्याची परवानगी मागीतलेली आहे.

०५. वादी तर्फे अर्जास हरकत घेण्यात आलेली आहे. वादीचे असे कथन आहे की अर्ज हा खोटा व खोडसाळ आहे व दाव्यास जाणूनबुजून विलंब करण्याच्या हेतूने प्रेरीत आहे . अर्जास पुरेशे आणि समर्पक नाही . कोणतेही समर्थनीय कागद दाखल केलेले नाहीत . सबब अर्ज फेटाळण्यात यावी आशी विनंती वादी तर्फे करण्यात आली . अर्ज मान्य करावयाचा झाल्यास कॉस्ट बसविण्यात यावी असे कथन वादी तर्फे करण्यात आली.

०६. वादपत्राचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी यांनी केलेली कथने तसेच युक्तीवाद विचारात घेतला. प्रतिवादीं तर्फे त्यांना माहितीचा अभाव असल्याने लेखी कैफियत सादर करण्यास विलंब झाला असे कारण नमूद केलेले आहे . परंतू सदर कारण कायदयाच्या दृष्टीने विचारात घेता येणार नाही. प्रतिवीद क्र.७ व १५ यांना दाव्याचे समन्स प्राप्त झाल्यानंतर त्या संदर्भाने त्यांनी आवश्यक कार्यवाही करणे आवश्यक होते. परंतू तसे केल्याचे दिसून येत नाही. या व्यतिरिक्त अभीलेखाचे परिक्षण करता प्रतिवादी क्र .७ व १५ यांचे विरुध्द विना लेखी कैफियत

आदेश पारीत झालेला नाही. दाव्याचे स्वरुप विचारात घेता प्रतिवादी क्र.७ व १५ यांना वादी यास खर्च रक्कम रुपये ५०० /–(रुपये पाचशे मात्र ) प्रत्येकी देण्याच्या अटीवर मंजूर करणे योग्य वाटते. सबब, मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे .

**आदेश**

०१. अर्ज नि.५२ प्रतिवादी क्र.७ व १५ यांनी प्रत्येकी रक्कम रुपये ५००/– (रक्कम रुपये पाचशे मात्र ) खर्च वादीस देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

०२. प्रतिवादी क्र.७ व १५ यांना लेखी कैफियत सादर करण्यासा झालेला विलंब क्षमापित करण्यात येत आहे व त्यांना लेखी कैफियत सादर करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

०३. वादी यांनी रक्कम अदा केल्यानंतर नियमाप्रमाणे लेखी कैफियत अभिलेखावर स्वीकारण्यात यावे.

TIDKE AMARDEEP DADARAO
Digitally signed by TIDKE AMARDEEP DADARAO
Date: 2025.02.05 17:20:07 +0530

ओरोस
दिनांक – ०४/०२/२०२५

**(अे.डी.तिडके)**
सह दिवाणी न्यायाधीश (व. स्तर),
सिंधुदुर्ग–ओरोस.